


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २५२, रविवार २३ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# अळकुटी गणातील सरपंचांचा आदर्श आता जिल्ह्यात !

## ■ अळकुटी गणातील १३ सरपंचांचा खा. लंके यांच्याकडून गौरव ■ निघोज येथे लंके यांचा नागरी सत्कार

निघोज : प्रतिनिधी

**अळकुटी गणातील १३ सरपंचांनी लोकसभा निवडणूकीमध्ये ज्या पध्दतीने आदर्श काम करून मोठे मताधिक्य दिले. त्यांचा आदर्श संपूर्ण जिल्हयाने घेतला पाहिजे. हा आदर्श मी संपूर्ण जिल्हयात सांगणार आहे. मी पवार साहेबांना शब्द दिला आहे की, गाडी चालवायला मी आणि जिल्हयातील १२ महाविकास आघाडीचे आमदार मुंबईला घेऊन येईल. या १३ सरपंचांच्या आदर्शप्रमाणे सर्व मतदारसंघात प्रचाराचे नियोजन करायचे असल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.**

लोकसभा निवडणूकीत मिळविलेल्या विजयाबद्दल खा. नीलेश लंके यांचा निघोज-अळकुटी गटाच्या वतीने निघोज येथे नागरी सत्कार करण्यात आला, त्यावेळी त्यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, निघोज गावाने, गटाने विधानसभा निवडणूकीतही मोठे मताधिक्य दिले, तसेच लोकसभेलाही दिले. यावेळी मात्र विरोधकांकडून काहीतरी वल्गना केल्या जात होत्या मतदारांनी मात्र त्या फोल ठरविल्या. तालुक्यात अनेक भावी आमदार झाले आहेत. भावी खासदारही काही झाले होते. हे असेच सुरू राहणार आहे. आपले राजमार्गाने पुढे चालत राहायचे आहे. कोणी टीका टिपन्नी केली तर त्याकडे दुर्लक्ष करा. प्रत्येक गावात २५, ५० वर्षात विकास झाला नाही असा विकास मार्गी लावला असल्याचे लंके म्हणाले.

यावेळी अशोकराव सावंत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.डॉ.भास्करराव शिरोळे, सुदाम पवार,बापू शिर्के, दिपक आण्णा लंके, सोमनाथ वरखडे, जितेश सरडे, अनिल गंधाक्ते, सचिन साखला, बाळासाहेब पुंडे, पप्पू मते, चोंभूतचे सरपंच दत्तात्रय म्हस्के, संतोष ठकाराम लंके, सुनिल वरा, शांताराम लाळगे, वसंत ढवण, संचालक शांताराम कवाद, संतोष लामखडे,चंद्रकांत लंके,शिवाजीराव लंके,ज्ञानेश्वर लंके, प्रा. ज्ञानेश्वर कवाद, अनिल शेटे, शांताराम कळसकर विश्वास रामदास वरखडे, विश्वस्त अनिल लंके, विठ्ठलराव कवाद, शंकरराव लामखडे, ॲड.रामदास लामखडे, संतोष रसाळ, रोहिदास लामखडे, उत्तम लामखडे, गोविंद लामखडे, सुधामती कवाद, भावना साळवे, महेश ढवळे, सतिष साळवे,बाबाजी वाघमारे,भास्कर कवाद, भरत ढवळे, संदीप वराळ,अमृताशेठ रसाळ,रुपेश ढवण, दिलीपराव ढवण, नामदेवराव थोरात, भिवा रसाळ,आशा वरखडे,सिमा वराळ, विश्वस्त रमेश ढवळे, अशोक वरखडे, बबनराव ससाणे, महेश ढवळे आदी.उपस्थित होते.



■ निघोज जिल्हा परिषद गटातील नागरीकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात खा. नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले.

### लोकांनी मते दिली आणि दुवाँही दिली

मी नगर मतदारसंघात खासदार झालो मात्र प्रत्येक मतदरसंघात आपले अभिनंदनाचे फलक लागले आहेत. इतके प्रेम राज्यातील लोक आपल्यावर करतात. राज्याच्या अनेक भागांतून अनेक लोक आपल्या प्रचाराला आले. लोकांनी मते दिली आणि दुवाँही दिली. इतके नवस केले आहेत की ते फेडण्यासाठी पाच वर्षे लागतील असे लंके म्हणाले.

### तुमचा हिशोब करायला वेळ लागणार नाही

माझ्या विषयी एकेरी भाषा वापरणारांना मी आमदार कधी झालो आणि कधी खासदार झालो हे देखील कळाले नाही. आपली लायकी काय ? आपली पात्रता काय हे तपासले पाहिजे. नीलेश लंकेला एक ते शंभरपर्यंत पण मोजता येतात, आणि शंभरपासून एकपर्यंतही मोजता येतात हे त्यांनी लक्षात ठेवावे. तुमचा हिशोब करायला आम्हाला वेळ लागणार नाही. तुम्ही लोकांच्या टाळूवरचे लोणी खाऊन राजकारण करता. ग्रामपंचायतमधील भ्रष्टाचार बाहेर काढू का ? तुम्ही किती ठिकाणी हात पुढे करता हे आम्हाला माहीती नाही का ? असे प्रश्न उपस्थित करीत लंके यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.

### आमचा नाद करू नका

हे महाशय मुंबईला गेले, म्हणाले, २०२४ ची दहीहंडी आम्ही फोडणार अशी वल्गना केली. दहीहंडी सोडा तुम्हालाच फोडून काढू हे लक्षात ठेवा ! गुन्हेगारी, दहशत, दादागिरी नीलेश लंकेला कोणी सांगू नये. हे मी उकळून पिलो असून त्यामुळेच मी तुमच्या नेत्याला पाडले आहे. ज्यांच्या विरोधात कोणी लढत नाही त्यांच्याविरोधात बाहया वर करून निवडणूक लढलो आणि निवडून आलो आहे. त्यामुळे आमचा नाद करू नका करायचा असेल तर गल्ली बोळांतल्यांचा करा. थोडं थांबा राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार असल्याचा दावा लंके यांनी केला.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मंत्रयांना जिल्हयात फिरू देणार नाही

माझं नातं सर्वसामान्य शेतकऱ्यांशी आहे, माझ्या शेतकरी वर्गाला पिळविण्याचं काम सुरू आहे. माझी शपथ झाली नसल्याने माला काही तांत्रीक अडचणी आहेत. परंतू मी शपथ घेतल्यानंतर, शिक्षक मतदारसंघाची आचारसंहिता संपताच कांदा तसेच दुधाच्या प्रश्नावर जिल्हा पातळीवर आंदोलन करणार आहे. एकाही मंत्रयाला जिल्हयात फिरू देणार नसल्याचे लंके म्हणाले.

### जिथे खाता तिथेच तुम्ही छेद करता !

तुमच्यावर आम्ही उपकार केले त्याची जाणीव नाही का तुम्हाला ? रेमडीसिविर इंजेक्शन आम्ही दिले, ज्याच्यासाठी उडया मरता त्याने दिले का ? आमची भावना साफ होती. तुमच्या कोविड सेंटरला मदत कोणी केली ? आणि तुम्हीच कोविड सेंटरवर आरोप करता काय ? जिथे खाता तिथेच तुम्ही छेद करता. चार सहा टुकांराना सोबत घेउन निघोजमध्ये वातावरण दुषीत करता का ? नीलेश लके आता जिल्हयाचा नेता झालाय हे विसरायचं नाही असे सांगत निघोजचे सचिन वराळ यांचे नाव न घेता लंके यांनी त्यांना थेट सुनावले.

### असे केले तर तुमचा नेता कसा निवडून येईल ?

त्यांच्यातला एकजण पैसे वाटत होता. आमच्या कार्यकर्त्यांनी त्यांना जागा दाखविली आणि एकजण पैसे घेउन पळून आला. असे केल्यावर तुमचा नेता कसा निवडून येईल ? असा सवाल लंके यांनी केला.

### पत्रकारांनी तालुक्याची अस्मिता जपली

पारनेरच्या खऱ्या पत्रकारांनी चांगले काम केले. त्यांनी पारनेरची अस्मिता जपली. तालुक्यात अनेक डुप्लीकेट पत्रकार झाले आहेत. काहीही सामाजिक योगदान नसताना अनेक सहकारी संस्थांना त्रास देण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचा आरोप लंके यांनी केला.

### ते भावी आमदार म्हणून मिरवत होते !

काहींना आपण फार मोठे झालो असे वाटत होते. २०० मतांच्या प्रभागात निवडूण आले ते भावी आमदार म्हणून मिरवत आहेत. ते मुंबईत जाउन माझ्या विरोधात गरळ ओकत होते. आता गेले आहेत आत. बसा तिथेच आता असे सांगत खा. लंके यांनी मा. नगराध्यक्ष विजय औटी यांचे नाव न घेता त्यांच्यावर प्रथमच भाष्य केले.

# ईव्हिएमची पडताळणी हा फार्सच!

## ■ विखेंच्या मतांमध्ये फरकाची संभावना धुसरच ■ मात्र मताधिक्य वाढले तर भाजपाच्या अंगलटी ■ ईव्हिएम ऐवजी बॅलेट पेपरची मागणी येणार

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे भाजपाचे पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दिलेल्या निर्देशाप्रमाणे ईव्हिएम मायक्रो कंट्रोलरच्या पडताळणीची मागणी केली ही बाब सकृतदर्शनी अधोरेखीत करावी लागेल. वास्तविक या मागणीशी न्यायालयीन प्रक्रियेशी थेट संबंध बिलकूलसुध्दा नाही. विशेष म्हणजे ही पडताळणी निवडणूक आयोगाची यंत्रणा सुध्दा करणार नसून ईव्हिएम तयार करणाऱ्या कंपनीचे तंत्रज्ञ ती करणार आहेत. त्यावर निवडणूक आयोगाची निगराणी असेल. ही पडताळणी घोषित मतांशी जुळली तर पुढा विषयच येणार नाही.

मग एवढा खटाटोप का आणि कशासाठी याचे उत्तर शोधले तर भाजपाला ही पडताळणी का व कशासाठी हवी याचा उलगडा होउ शकतो. भरताच्या ईव्हिएम मशीन संदर्भात जागतिक पातळीवर मोठया प्रमाणावर अपप्रचार सुरू आहे. प्रसिध्द उद्योजक फेसबुकचे ॲलन मस्क यांनी या मशीनबाबत संशयास्पद गौप्यस्फोट केलेत. त्यांची री काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रिव्टिट करून ओढली. अन्य विरोधी नेत्यांनी त्यांच्याच सुरात सुर मिळविलेत. विरोधकांच्या हातात आयतेच कोलीत मिळणार, ईव्हिएम मशिनऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे हा मतप्रवाह प्रबळ होण्याचा धोका संभवतो. हे केंद्रातील मोदी सरकारच्या पचनी पडणे अशक्यप्राय दिसते. त्यामुळेच विरोधी पक्षाच्या उमेदवाराबरोबरच भाजपाच्या पराभूत झालेल्या तीन उमेदवारांना पडताळणी करण्याबाबत सुचित केले असू शकते. त्यात डॉ. सुजय विखे यांचा समावेश झालेला दिसतो. त्यांनी हे बालंट कार्यकर्त्यांच्या मागणीवर ढकलले आहे. कार्यकर्त्यांना संशय असल्यामुळे विखेंनी पडताळणीचा अर्ज केला म्हणजे भाजपाच्या कार्यकर्त्यांनाच ईव्हिएमवर शंका आहे हे सुचित होते. विखेंचे कार्यकर्ते भाजपाचेच असणार. जे काल-परवापर्यंत ईव्हिएमचे समर्थन करत होते. तेच विरोध करत असतील तर शंकेची पाल चुकचुकते.




वास्तविक भाजपा हे जाणतो की पडताळणीतून काहीच निष्पन्न होणार नाही. ईव्हिएम मशीनची यंत्रणा योग्यच आहे. हे या निमित्ताने सिध्द करून जागतिक पातळीवर जी बदनामी होते ती थांबविण्याचा हा खुष्कीचा मार्ग असू शकतो. भारत सरकारला आमची निवडणूक यंत्रणा ईव्हिएमच्या माध्यमातून किती सक्षम आहे, हे जगापुढे ठासवाचे हाच या पडताळणीच्या मागणीचा खरा उद्देश असू शकतो. थोडी जरी गडबड आढळली तर लोकशाही आणि ईव्हिएम वरील विश्वास उडून केंद्रातील एनडीएचे सरकार डळमळीत होऊ शकते. याचे दुरगामी परिणाम संभवतात. त्यामुळे हे शक्यतो होणे नाही. निवडणूक आयोगाने यापूर्वी सुध्दा ईव्हिएम बाबत विरोधकांना आव्हान देउन प्रात्यक्षिके घेतलेली आहेत. हे दुर्लक्षून चालता येणार नाही.

ईव्हिएमची पडताळणी होऊनही डॉ. विखेंचे मताधिक्य वाढण्याची शक्यता तशी धुसरच ही पहिली शक्यता गृहीत धरावी लागेल. तरी सुध्दा दुसरी शक्यता मते वाढली तर ती किती असू शकतील ? खासदार नीलेश लंके यांच्या २९ हजार लिडमध्ये कदाचित फरक पडला तरी डॉ. विखे विजयापर्यंत जाऊ शकतील इतपत तो असू शकणार नाही. परंतू मतांमध्ये फरक पडला तरी डॉ. सुजय विखे यांना न्यायालयात जाण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. हा जर तरचा भाग झाला. वास्तविक डॉ. सुजय विखे यांना पडताळणीशिवाय न्यायालयात जाता आले असते. तेथे पडताळणीचा मुद्दा



उपस्थित झाला असता. पण त्यांनी तो मार्ग अवलंबला नाही. त्यांनी थेट पडताळणीसाठी अर्ज केला. परंतू दहा-पंधरा दिवस त्याची वाच्यता होऊ दिली नाही.

**■ विखेंच्या यंत्रणेने प्रसिध्दी का टाळली ?**

उठसुट माध्यमांकडे जाणाऱ्या विखेंच्या यंत्रणेने निवडणूक आयोगाकडे केलेल्या अर्जाला प्रसिध्दी का टाळली याचे कोडे उलगडत नाही. इकोनॉमिक टाईम्स या देशपातळीवरील इंग्रजी दैनिकात वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर विखेंच्या अर्जावर चर्चा सुरू झाली. राजकीय वर्तुळात जो-तो आपल्या बौध्दिक क्षमतेनुसार अर्थ लावू लागला ...१९९१ च्या खटल्याची पुनरावृत्ती होणार असे अंदाज बांधू लागला. अर्थात वस्तूस्थिती तशी नाही हे फारसे लक्षात घेतले जात नाही.

**■ स्व. विखे यांच्या याचिकेचे मेरिट वेगळे**

मा. खासदार स्व. बाळासाहेब विखे यांच्या याचिकेचे मेरिट वेगळे होते. त्यात चिन्हाच्या साधर्म्याचा मुद्दा होता. विखेंची सायकल आणि अपक्ष देशमुख यांची मोटारसायकल असे हे साधर्म्य होते. त्यावेळी अपक्ष देशमुख हे कोपरगांव उत्तर आणि नगर दक्षिण अशा दोन्ही मतदारसंघात एकाच वेळी उमेदवार होते. उत्तरेत देशमुख यांना २५२ मते होतमी तर दक्षिण नगरमध्ये १० हजार ९३१ मते त्यांच्या मोटारसायकल या चिन्हाला मिळाली होती. त्यावर न्यायालयायाने भाष्य करून निकालासाठी हा मुद्दा पुरक मानला होता.

**■ यावेळीची स्थिती खा. लंकेंच्या पथ्यावर पडणारी**

१९९१ ची स्थिती दक्षिणेत यावेळी म्हणजे २०२४ला जरूर आहे. पण ती खासदार लंके यांच्या पथ्थ्यावर पडणारी आहे. तुतारी आणि पिपाणी या दोन चिन्हांच्या मतांमध्ये गडबड जाणवते. अपक्ष उमेदवाराच्या पिपाणी या चिन्हाला तब्बल ४४ हजारांपर्यंत मते मिळाली आहेत. फरक झाला तर तुतारी आणि पिपाणीच्या मतांमध्ये होउ शकतो. कमळाची मते कमी अधिक होण्याची शक्यता तशी कमीच दिसते. काळजीपूर्वक यंत्रणा हाताळण्यात आली होती. त्यामुळेच राज्यात दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघाची आकडेवारी उशिराने जाहिर होत होती. त्यात ही संपूर्ण जबाबदारी महसूल खाते हाताळत होते. राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे आहेत. तेच नगर जिल्हयाचे पालकमंत्री असल्याने यंत्रणेकडून दुर्लक्ष होणे शक्यच नाही.

**■ १९९१ व २०२४ मध्ये शरद पवार हेच केंद्रस्थानी**

१९९१ च्या विखे-गडाख खटल्यामुळे निवडणूक आचारसंहितेची कडक अंमलबजावणीची देणगी देशाला मिळाली. तर २०२४ च्या विखे-लंके राजकीय संघर्षात एक तर ईव्हिएम मशीनवर पुन्हा शिक्कामोर्तब होईल किंवा मतदान बॅलेट पेपरवर घेण्याची सर्वात्रीक मागणी पुढे येऊ शकते. विशेष म्हणजे खटला होवो न होवो, १९९१ आणि २०२४ च्या निवडणूकीतील समान धागा एकच तो म्हणजे शरद पवार हेच आहेत. विखेंच्या १९९१ मध्ये आणि आता २०२४ च्या निवडणूकीत शरद पवार हेच विखे यांच्या विरोधातील केंद्र बिंदू आहेत.









# चंदेरी

## जॉन अब्राहम अन् अल्लू अर्जुनची बॉक्स ऑफिसवर होणार टक्कर





**चाहते अनेक दिवसांपासून अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट जेव्हा थिएटरमध्ये दाखल होईल तेव्हा तो खळबळ उडवेल, असे चाहत्यांचे म्हणणे आहे. मात्र या चित्रपटाची टक्कर जॉन अब्राहमच्या वेद चित्रपटाशी होणार आहे. हे दोन्ही चित्रपट १५ ऑगस्टला प्रदर्शित होत आहेत. म्हणजेच या वर्षातील पहिली मोठी टक्कर १५ ऑगस्टला पाहायला मिळणार असून, जॉन अब्राहम आणि अल्लू अर्जुन आमनेसामने येणार आहेत.**

जॉन अब्राहमने त्याच्या वेद चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करताना X वर लिहिले, की या स्वातंत्र्य दिनी, ते येत आहेत... न्यायाची लढाई लढण्यासाठी. वेद १५ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. 'वेद'चे दिग्दर्शन निखिल अडवाणीने केले आहे. या चित्रपटात तमन्ना भाटिया आणि शर्वरी वाघ यांच्या प्रमुख भूमिका आहेत, तर 'पुष्पाः द रुल'चे दिग्दर्शन सुकुमार यांनी केले आहे. अल्लू अर्जुन व्यतिरिक्त या चित्रपटात रश्मिका मंदाना आणि फहद फासिलसह इतर अनेक कलाकार आहेत. हा चित्रपट हिंदीशिवाय तामिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्येही प्रदर्शित होणार आहे.

### सिंघम अगेन १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार ?



रोहित शेट्टीही १५ ऑगस्टला त्याचा सिंघम अगेन चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार करत असल्याच्या बातम्या आल्या होत्या. तथापि, अद्याप रिलीजच्या तारखेबाबत निर्मात्यांकडून कोणतेही अपडेट आलेले नाही. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असल्याचे रोहित शेट्टीने सांगितले होते. जर सिंघम अगेनही त्याच दिवशी रिलीज झाला तर तो या वर्षातील बॉक्स ऑफिसवरील सर्वात मोठी टक्कर मानला जाईल.

## ...म्हणून मीनाक्षी सर्वांत आधी जॅकी श्रॉफला भेटली!

**नव्वदच्या दशकात आपल्या अभिनय आणि सौंदर्याने लाखो हृदयांवर राज्य करणाऱ्या मीनाक्षी शेषाद्रीने करिअरच्या शिखरावर असताना लग्न केले अन् चित्रपट क्षेत्र सोडले. ती तिच्या पतीसोबत अमेरिकेत स्थायिक झाली आणि तिथे डान्स स्कूल अकादमी चालवू लागली. पण आता मीनाक्षी शेषाद्री भारतात परतल्यावर तिची पहिली भेट जॅकी श्रॉफशी झाली. ती त्याच्यासोबत एका फिल्म पार्टीलाही गेली होती. मीनाक्षी परत आल्यानंतर फक्त जॅकी श्रॉफला का भेटली आणि तिने इतर कोणत्याही बॉलिवूड स्टारशी का संपर्क साधला नाही याचे कारणही या अभिनेत्रीने स्पष्ट केले...**



मीनाक्षी शेषाद्रीला आता मुंबईत नव्या प्रवासाचा आनंद घ्यायचा आहे. तिला जुन्या मित्रांशी देखील पुन्हा संपर्क साधायचा आहे. मीनाक्षी नुकतीच जॅकी श्रॉफला भेटली होती आणि आता तिला संगीता बिजलानीला भेटायचे आहे. मीनाक्षीने सांगितले की, जॅकी श्रॉफ ही अशी व्यक्ती आहे ज्यांच्याशी मी परत आल्यानंतर संपर्क केला. कारण ते माझे नेहमीच अतिखास राहिले. हीरो चित्रपटापासून आमची मैत्री आहे आणि ती कायम राहिली. त्यामुळे मुंबईला आल्यावर सर्वांत आधी मी त्यांची भेट घेतली. आता ते मुंबईतील वेगवेगळ्या कार्यक्रमांना मला निमंत्रित करत आहेत. मीनाक्षी शेषाद्रीने १९८३ साली पेंटर बाबू या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. पण त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या हीरो या चित्रपटातून त्याला स्टारडम मिळाले. या चित्रपटात मीनाक्षी शेषाद्रीचा हिरो होता जॅकी श्रॉफ. या चित्रपटामुळे दोघेही रातोरात स्टार झाले. नंतर मीनाक्षी शेषाद्रीने दामिनी, मेरी जंग, शहेनशाह, बडे घर की बेटी, प्यार का कर्ज आणि घायल यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले. मात्र, मीनाक्षीला दुःख आहे की, तिने आणि जॅकीने हीरोमध्ये जसा करिष्मा केला होता तसा करिष्मा इतर चित्रपटांमध्ये करू शकली नाही. ती म्हणाली, की हीरोच्या यशाची पुनरावृत्ती होऊ शकली नाही. कारण जॅकी आणि मी त्यानंतर केलेल्या चित्रपटांमध्ये प्रेक्षकांना जे हवे होते ते मिळाले नाही. त्यांना तो रोमान्स दिसला नाही.

### मला 'दामिनी'मधून हाकलण्यात आले...



मीनाक्षी शेषाद्रीने अनेक संस्मरणीय चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारल्या. त्यापैकी एक म्हणजे १९९३ मध्ये प्रदर्शित झालेला राजकुमार संतोषी यांचा दामिनी. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अभिनेत्रीला वाईट अनुभव आला होता. मीनाक्षीने आता खुलासा केला की राजकुमार संतोषीचा रोमँटिक प्रपोजल आणि लग्नाचा प्रस्ताव नाकारल्यानंतर तिला चित्रपटातून वगळण्यात आले. अशा परिस्थितीतही ती कशी गप्प राहिली आणि शेवटी, प्रोड्यूसर्स गिल्डच्या पाठिंब्यामुळे पुन्हा चित्रपटात सामील होण्याची संधी कशी मिळाली याबाबत मीनाक्षी म्हणाली, की राजकुमार संतोषी जी आणि मी याविषयी न बोलण्याचा निर्णय घेतला आहे. ही गोष्ट आता जुनी झाली आहे. पण धैर्याने उभे राहणे महत्त्वाचे होते. मी गप्प राहून ते प्रकरण हाताळले. मी या चित्रपटाशी संबंधित प्रत्येकाचा, विशेषतः संतोषीजींचा आदर करते. त्यांना माझ्याकडून ज्या अपेक्षा होत्या, त्या माझ्या तत्वात बसत नव्हत्या. वेगळी तक्रार करून सनसनाटी निर्माण करण्यापेक्षा केवळ चित्रपट न सोडण्याची भूमिका घेत त्यादृष्टीने हालचाली केल्या. मला नातेसंबंध कायमचे खराब करायचे नव्हते. मीनाक्षीने १९९५ मध्ये हरीश म्हैसूरशी लग्न केले. या दाम्पत्याला एक मुलगी आणि एक मुलगा अशी दोन अपत्ये आहेत. मीनाक्षी आणि राजकुमार संतोषी यांचा एकत्र पहिला चित्रपट घायाल (१९९०) होता. दामिनीनंतर त्यांनी १९९६ मध्ये घटकसाठी पुन्हा एकत्र काम केले.

## भाभी २ तृप्ती डिमरीने खरेदी केला करोडोंचा सुंदर, आलिशान बंगला



अभिनेत्री तृप्ती डिमरी ही सध्या आनंदात आहे. कारण अलीकडेच तिने एक आलिशान बंगला खरेदी केला आहे, ज्याची किंमत १४ कोटी रुपये आहे. हा बंगला मुंबईतील पश्चिम वांद्रे भागात कार्टर रोडवर आहे. ग्राउंड प्लस दोन मजली बंगला तृप्तीने खरेदी केला आहे. तृप्ती ॲनिमल चित्रपटातून प्रसिद्धीच्या झोतात आली होती. त्याआधीही तिने अनेक चित्रपट केले होते, मात्र संदीप रेड्डी वंगा यांच्या ॲनिमलमधून तिला स्टारडम मिळाले. यानंतर तृप्तीकडे चित्रपटांच्या ऑफर्सची रांग लागली. तृप्ती लवकरच करण जोहरच्या धडक २ चित्रपटात दिसणार आहे. पण यादरम्यान तिने एक सुंदर बंगला विकत घेतला आहे. तिने ७० लाख रुपये मुद्रांक शुल्क भरले आहे. तृप्ती डिमरी यांचा नवीन बंगला २ हजार २२६ स्क्वेअर फूट आहे आणि बिल्ट-अप एरिया २ हजार १९४ स्क्वेअर फूट आहे. तिने ३० हजार रुपये नोंदणी शुल्कही भरल्याचे सांगितले जात आहे. उत्तराखंडची रहिवासी असलेल्या तृप्तीने २०१७ मध्ये श्रेयस तळपदेच्या पोस्टर बॉईज या कॉमेडी चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर आणखी काही चित्रपट केले, पण यश मिळाले नाही. पण बुलबुल चित्रपटाने तृप्ती डिमरी ला प्रसिद्धीच्या झोतात आणले. नंतर ॲनिमलने तृप्ती डिमरी यांना रातोरात स्टार बनवले. सध्या तिच्याकडे ४ चित्रपट आहेत, ज्यामध्ये धडक २ व्यतिरिक्त वाईट न्यूज, विकी विद्या का वो वाला व्हिडिओ आणि भूल भुलैया ३ यांचा समावेश आहे.

## तणावामुळे अदा शर्माला गंभीर आजार

**अदा शर्मा आज बॉलिवूडमधील व्यस्त अभिनेत्रींपैकी एक आहे. तिचे अनेक चित्रपट आणि वेब सिरीज रिलीज झाल्या. तिला खूप पसंतीही मिळाली. पण या चित्रपटांसाठी अदा शर्माने केलेल्या शारीरिक परिवर्तनाचा तिच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. अदा शर्माने सांगितले की तिला एंडोमेट्रिओसिसचा त्रास सुरू झाला आहे.**



अदा शर्माने सांगितले की, मला या चित्रपटांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या शरीराची गरज होती. द केरळ स्टोरीसाठी पहिल्या भागात मला बारीक आणि दुबळे असायला हवे होते, जेणेकरून मी कॉलेज मुलीसारखी दिसावी. कमांडो चित्रपटासाठी मला कणखर असायला हवं होतं. सनफ्लॉवर चित्रपटासाठी मला कामुक आणि सेक्सी दिसावं लागलं, कारण मी बार डान्सरची भूमिका करत होते. 'बस्तर'साठी मला एक निरोगी आणि मजबूत शरीर अंगीकारावे लागले. बस्तर चित्रपटासाठी अदा शर्माने खूप वजन वाढवले होते. तिने सांगितले की, मी दिवसभरात सुमारे १० ते १२ केळी खाल्ली. कारण त्यांना माझे वजन वाढवायचे होते. चित्रपटात खूप ॲक्शनचे सीन होते. मलाही खऱ्या अर्थाने बलवान व्हायचे होते. कारण आमच्याकडे आठ किलो वजनाच्या, खडकाळ प्रदेश आणि पर्वतांवरून वर-खाली न्याव्या लागणाऱ्या खऱ्या बंदुका होत्या. मेवा, सुका मेवा आणि अंबाडीच्या बियांचे बरेच लाडू... मी ते नेहमी माझ्याजवळ ठेवायचे आणि झोपण्याच्या अर्धा तास आधी खायचे. अदा शर्मासाठी 'बस्तर' खूपच तणावपूर्ण चित्रपट राहिला. या काळात तिला वेट ट्रेनिंगमध्ये खूप अडचणी आल्या. ती एंडोमेट्रिओसिसची शिकार झाली. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये मासिक पाळी थांबत नाही. अदा शर्माने सांगितले की, तिला ४८ दिवस रक्तस्त्राव होत होता.

## मी कधीही पैशासाठी कोणतेही काम केलेले नाही...

### नेहा जोशीची मुलाखत : अभिनय माझ्यासाठी फक्त काम नाही, ती पूजा आहे....

**'अटल' या मालिकेत दिसलेली नेहा जोशी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या आई कृष्णादेवीची भूमिका साकारत आहे. विशेष मुलाखतीत नेहाने अभिनयापासून ते तिच्या कुटुंबापर्यंत सर्व गोष्टींचा खुलासा केला. ती म्हणाली, मी रोज पूजा करत नाही पण माझे काम रोज प्रामाणिकपणे करते...**

नेहा म्हणते, की मी माझ्या कामातून करिअरमध्ये इथंवर आले आहे. माझ्यासाठी माझे काम फक्त नोकरी नाही. मला माझे काम खूप आवडते. माझ्यासाठी माझे काम देव आणि माझी पूजा आहे. मी रोज पूजा करत नाही पण मी माझे काम रोज प्रामाणिकपणे करते. त्यामुळे रात्री मला वाटते की माझी आजची पूजा झाली आहे. त्यामुळे त्या कार्यातून मी भगवंताचे दर्शन घेतले, ही माझ्यासाठी त्याहूनही मोठी गोष्ट आहे. नेहा सांगते की तिने कधीही पैशासाठी कोणतेही काम केले नाही. नेहाच्या म्हणण्यानुसार, मला सांगायला अभिमान वाटतो की, मी कधीच केवळ पैशासाठी काम केले नाही. माझा विश्वास आहे की ही मूल्यांची बाब आहे. आमच्या शो अटलमध्येही आम्ही सांगत आहोत की अशा उंचीवर पोहोचणाऱ्या व्यक्तीचा पाया त्याच्या बालपणातच असतो. ती मूल्ये त्याला घरातूनच मिळतात. अटलजींचे वडील कृष्णा बिहारी हे शिक्षक होते तर त्यांची आई त्या काळातील सुशिक्षित महिला होती. तिथून त्यांना जी मूल्ये मिळाली त्यामुळे ते भारताच्या सर्वात प्रिय पंतप्रधानांपैकी एक बनले. त्याचप्रमाणे मी स्वतः अतिशय प्रगतीशील कुटुंबातून आले आहे. मी संयुक्त कुटुंबात वाढले. माझे आजी आजोबा, माझे चार काका, काकू, त्यांची मुले, आम्ही सर्व एकाच घरात राहत होतो. माझ्या वडिलांच्या काकू नर्स होत्या. तिने नर्सिंगचा कोर्स केला होता. ही गोष्ट सुमारे शंभर वर्षे जुनी आहे. माझ्या मावशीच्या पतीचे निधन झाले होते. मग महाराष्ट्रात पतीचे निधन झाले की स्त्रीचे केस काढले जातात. मावशीचे केस कापले नव्हते. माझ्या आजीनेही नर्सिंगचा कोर्स केला आणि माझ्या मावशीचे प्रसूतिगृह चालवले. माझे आई आणि वडील गेली पन्नास वर्षे नाशिकमध्ये थिएटर करत आहेत. माझ्या भावानेही थिएटर केले आहे, त्यामुळे माझ्या घरात अभ्यास आणि कला या दोन्ही गोष्टींना खूप महत्त्व आहे. त्यामुळे मी माझ्या कामाला खूप महत्त्व देते, असे नेहा म्हणाली.





### फक्त आईच नाही तर पडद्यावर मी वेश्याही बनले आहे...

महानायक : बी.आर. आंबेडकर, दुसरी मां आणि आता अटल... तिन्ही हिंदी मालिकांमध्ये आईची भूमिका साकारणारी नेहा म्हणते, की मी आईच्या भूमिकांबरोबरच मराठी चित्रपटात वेश्येचीही भूमिका केली आहे. मी अशी भूमिका करेन की नाही याच्या मर्यादा मी स्वतःसाठी ठेवलेल्या नाहीत. होय, असे आहे की जर ही बोल्ड भूमिका असेल तर मी नक्की बघेन की निर्माता कोण आहे? त्याने यापूर्वी कोणते काम केले आहे? जर निर्मात्याचा हेतू चांगला असेल तर त्याच्या नग्न दृश्यांमध्येही प्रामाणिकपणा आणि सभ्यता आहे. ओंकारातील प्रेम दृश्यही आपण पाहिले आहे. मी हैदरमध्ये आई-मुलाचा असा सीन पाहिला आहे जो अत्यंत जबाबदारीने केला होता, मग मला बघायचे आहे की या जवळीकीचा हेतू काय आहे? या धाडसी पात्राचा किंवा कृतीचा उद्देश काय आहे? जर ते माझ्यासाठी योग्य असेल तर मी ते करेन, कारण मी एक अभिनेता आहे, मी शिक्षक नाही. जर मी सेक्स वर्करची भूमिका करत असेल तर ती पूर्ण प्रामाणिकपणे साकारणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे.

## शॉर्ट न्यूज

### शेतात नांगरणी करणाऱ्या शेतकऱ्यावर हल्ला

**कळस :** येथील दीपक पुंजा वाकचौरे हे त्यांच्या शेतामध्ये दुपारी दोनच्या दरम्यान नांगरणी करीत होते. यावेळी शेजारील शेतकऱ्यांनी हे वावर नांगरू नको, असे म्हणून त्यांना शिवीगाळ केली तसेच हे वावर नांगरलं तर आम्ही तुझा खून करू, अशी धमकी देऊन ट्रॅक्टरवर दगडफेक केली. यात ट्रॅक्टरचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी दीपक वाकचौरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अकोले पोलिसांनी रामभाऊ एकनाथ वाकचौरे व बाळासाहेब काशिनाथ वाकचौरे यांच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आला आहे.

### भाजपने दलित समाजाला न्याय दिला

**अकोले :** राज्यसभेचे खासदार रामदास आठवले यांना नरेंद्र मोदींनी त्यांच्या मंत्रिमंडळात पुन्हा संधी दिली आहे. त्यांचा मंत्रीमंडळात समावेशने अकोले तालुक्यात आनंद व्यक्त करत अकोल तालुका आर. पी. आय युवकचे तालुका अध्यक्ष विजय पवार यांनीं त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे. रामदास आठवले यांनी १० वर्ष पार पाडली आहे म्हणून त्यांना पुन्हा तिसऱ्यांदा मंत्रीमंडळात संधी दिल्याने मोदींनी दलित समाजाला न्याय दिला, असे तालुका अध्यक्ष विजय पवार यांनी म्हटले आहे.

### कोपरगावात रविवारी शेतकरी भवनाचे उद्घाटन

**कोपरगाव :** गोदावरी खोरे नामदेवराव परजणे पाटील तालुका सहकारी दूध उपादक संघाचे संस्थापक नामदेवराव परजणे यांच्या विसाव्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त रविवारी (दि. २३) विविध विकासात्मक कामाचा शुभारंभ केला जाणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष राजेश परजणे यांनी दिली. स्टेशनरोड लगत लोकनेते परजणे पाटील शॉपिंग कॉम्प्लेक्सचे तिसऱ्या मजल्यावर शेतकरी भवनाचे उद्घाटन होणार आहे. एनएलएम योजनेअंतर्गत मूरघास प्रकल्प मशिनरींचे उद्घाटन बायफमार्फत केल्यानंतर वृक्षांचे रोप वाटप करण्यात येणार आहे.

### मागण्यांसाठी ओबीसींचा पाथर्डीत रास्ता रोको

**पाथर्डी :** राज्य सरकार हे ओबीसींच्या भावनांशी खेळत असून, एका व्यक्तीच्या इशाऱ्यावर हे सरकार नाचत आहे. वडीगोद्री येथे सुरू असलेल्या प्रा. लक्ष्मण हाके व ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या आंदोलनाची शासनाने तातडीने दखल घेऊन ओबीसी समाजाच्या मागण्या पूर्ण कराव्यात. जर ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागला तर राज्यातील सर्व ओबीसी समाज पेटून उठेल, असा इशारा ओबीसी आरक्षण बचाव कृती समितीच्या वतीने देण्यात आला.

### सर्व धर्मिय वधू-वर सुचक केंद्राची स्थापना

**श्रीरामपूर :** येथील रॉयल चॅरिटेबल ट्रस्ट संचालित रॉयल रिश्ता डॉटकॉम आणी पुणे येथील सुसंगम वधू - वर सुचक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर शहरात सर्व धर्मीय वधू वर सुचक केंद्राची स्थापना करण्यात आली असून या निमित्ताने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जुने प्रांत कार्यालय (महसूल भवन) या ठिकाणी रॉयल रिश्ता डॉटकॉम कार्यालयात सदरील सर्व धर्मीय वधू - वर सुचक केंद्राचे अनावरण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय नगरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

# महाविकास आघाडी सर्वाधिक जागा जिंकणार

**■ खा. नीलेश लंके यांचा विश्वास ■ मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांचे घेतले आशिर्वाद**
**■ विधानसभेसाठी नगर जिल्ह्यातून कार्यकर्त्यांच्या मेळाव्याची सुरूवात होणार**

मुंबई : विशेष प्रतिनिधी

येत्या विधानसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडी राज्यात सर्वाधिक जागा जिंकणार असल्याचा दावा करतानाच महाविकास आघाडीच्या विधानसभा निवडणूकीसाठीच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्याची सुरूवात नगर जिल्हयातून करण्याबाबत उद्धव ठाकरे यांनी आपणास सांगितले असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले. लवकरात लवकर तारीख निश्चित करून नगरमध्ये महाविकास आघाडीच्या मोठया मेळाव्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचेही खासदार लंके म्हणाले.

लोकसभा निवडणूकीत विजय संपादन केल्यानंतर शनिवारी खा. नीलेश लंके यांनी मुंबईत मातोश्री निवासस्थानी जात शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांची भेट घेउन त्यांचे आशिर्वाद घेतले. त्यांनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

खा.लंके म्हणाले, लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचे आशिर्वाद घेउनच दिल्लीला शपथ घेण्यासाठी जाण्याचा मी निर्धार केलेला होता. रविवारी मी दिल्लीला जाणार आहे. आज उध्दव साहेब यांचे आशिर्वाद घेतले. त्यांचे प्रेरणा घेऊन, स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आसनाचे दर्शन घेतल्याचे लंके म्हणाले.



माझा राजकीय प्रवास हा शिवसेना पक्षातूनच सुरू झाला. शाखाप्रमुख, उपगणप्रमुख, गण, गट, उप तालुकाप्रमुख या पदांवर काम करताना वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची पे्ररणा घेउन मी काम केले. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण ही स्व. बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका होती. नगर जिल्हयात कै. अनिल राठोड अशा नेतृत्वाखाली काम करणारा मी कार्यकर्ता आहे. त्यामुळे आजही स्व. बाळासाहेब ठाकरे, उध्दव ठाकरे यांची प्रेरणा घेऊन आम्ही काम करतो असे ते म्हणाले.

पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी व्हीव्हीपॅटच्या पडताळणीची मागणी केली आहे यावर बोलताना त्यांना काय करायचे असेल ते करू द्या, काही लोकांना पराभव मान्य नसतो त्यामुळे ते असे उलटे उद्योग करत असतात. त्याकडे दुर्लक्ष करून आपण आपले काम करत रहायचे असे आपले धोरण आहे. उध्दव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर नगर जिल्हयातील सर्व १२ आमदार महाविकास आघाडीचे निवडून आणण्याचा आपण निर्धार केला असल्याचे सांगितल्याचे लंके म्हणाले.

लोकसभा निवडणूकीच्या प्रचारासाठी येता आले नाही याबाबत उध्दव ठाकरे यांनी खंत व्यक्त केली. मात्र शुभारंभासाठी आदीत्य ठाकरे हे आले होते याची आपण आठवण त्यांना करून दिल्याचे लंके म्हणाले. माइ-या विजयामुळे उध्दव ठाकरे यांना अत्यानंद झाला. माझ्या सारखा कार्यकर्ता खासदार झाला त्याचा त्यांना आनंद आहे कारण आम्ही एका परीवारातील होतो असेही लंके यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

**पारनेरच्या डिझाईनचा**

**फलक मातोश्रीबाहेर !**

पारनेरचा ढाण्या वाघ मातोश्रीवर अशा आशयाचे डिझाईन करणाऱ्या तालुक्यातील सारोळा आडवाई येथील ग्राफीक्स डिझाईनर सुदेश आबूज याचा फलक मातोश्रीबाहेर झळकला होता. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शेततळे बनतायत मृत्यूचे सापळे

### आमदार तांबेंचे तीन मंत्र्यांना पत्र

संगमनेर : प्रतिनिधी

**राज्यात काही दिवसांपासून ग्रामीण भागातील मुलांचा शेततळ्यात बुडून मृत्यू होण्याचे प्रकार घडत आहेत. हे शेततळे अनेक बालकांसाठी मृत्यूचे सापळे ठरत आहेत. लहान मुलंच नव्हे तर सराईत पोहणारी मोठी माणसंही शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडत आहेत. या समस्येवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृती करावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, कृषी मंत्री धनंजय मुंडे व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

आमदार तांबे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, शेततळ्यांचे काठ निसरडे असतात, तसेच अनेकदा शेततळ्यात गाळ साचलेला असतो. त्यामुळे शेततळ्यात लहान मुलेच काय, अगदी पट्टीचे पोहणारे व्यक्तीही बुडण्याची शक्यता असते. यासाठी शेततळ्याची रचना, त्यापासून असणारे धोके विद्यार्थ्यांना सांगावे. शेततळ्यात पोहण्यासाठी जाऊ नये यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती बुडताना आढळल्यास काय करावे, याची माहिती विद्यार्थ्यांना असली पाहिजे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी, अशी मागणी आमदार तांबेंनी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केलेली आहे.









# सह्याद्री फार्म शेतकऱ्यांसाठी पंढरपूरच!

**| भाजप नेते विश्वनाथ कोरडे यांचे प्रतिपादन | नाशिकच्या सह्याद्री फार्मला पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची भेट**



**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक येथील सह्याद्री फार्म या शेतकऱ्यांनी एकत्र येत स्थापन केलेल्या कंपनीला पारनेर तालुक्यातील १५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी शुक्रवारी भेट दिली शेतकऱ्यांच्या या सहलीचे आयोजन अंजना सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी केले होते.**

सह्याद्री फार्म ही कंपनी नाशिक जिल्ह्यातील ७०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी एकत्र येत स्थापन केली आहे या कंपनीच्या माध्यमातून विदेशामध्ये शेतकऱ्याचा शेतीमाल बांधावरून पाठवला जातो. या कंपनीने प्रक्रिया उद्योगही त्या ठिकाणी उभे केले आहेत. ही शेतकऱ्यांची कंपनी असून शेतकऱ्यांच्या माध्यमातून चालवली जाते. पारनेर तालुक्यातील जवळा, निघोज, अळकुटी, सुपा, भाळवणी, पारनेर, कान्हूर पठार, वासुंदे, मांडवे खुर्द, टाकळी ढोकेश्वर व ढवळपुरी, या भागातील शेतकऱ्यांनी या कंपनीला भेट देत कंपनी विषयी माहिती जाणून घेतली.

पारनेर तालुक्यामध्ये कांदा, टोमॅटो, वाटाणा, मिरची ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. प्रक्रिया उद्योग पारनेर तालुक्याच्या पठार भागावर उभे राहावेत हा उद्देश समोर ठेवून विश्वनाथ कोरडे यांनी पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने सह्याद्री फार्म या प्रकल्पाचा पाहणी दौरा आयोजित केला होता.

यावेळी विश्वनाथ कोरडे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सह्याद्री फार्म ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांनी एकत्र येत उत्पादक कंपनी स्थापन केली. हा ॲग्रो प्रकल्प शेतकऱ्यांसाठी पंढरपूरच आहे. याच कंपनीच्या धरतीवर पारनेर तालुक्यामध्ये यापुढील काळात प्रक्रिया उद्योग उभे करण्यात येणार आहे आणि तालुक्यातील पारनेर भूमिपुत्र नावाने शेतकऱ्यांचीच कंपनी स्थापन करणार आहोत यामुळे या कंपनीच्या माध्यमातून आपल्या पारनेर भागातील पिकांवर आपल्याला प्रक्रिया करून ते जगाच्या बाजारपेठेमध्ये पाठवणे शक्य होईल.

### पारनेरच्या पठार भागावर शेतकरी उत्पादक कंपनी

**पारनेर तालुक्यामध्ये कांदा, वाटाणा, मिरची व टोमॅटो यासारखी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. शेतकऱ्यांना एकत्र करत पारनेर भूमिपुत्र या नावाने पठार भागावर लवकरच शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणार आहे. या माध्यमातून प्रक्रिया उद्योग उभे करणार असून शेतीमालासाठी कोल्ड स्टोरेज निर्माण करणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी हे करत असताना राजकारण विरहित काम करणार असल्याचे यावेळी भाजप नेते विश्वनाथ कोरडे यांनी सांगितले.**

# श्री.गोरेश्वर विद्यालयात प्रवेशोत्सव व मोफत पुस्तकांचे वितरण

**गोरेगाव : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री गोरेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, मॉडेल व्हिलेज गोरेगाव, या विद्यालयात, शैक्षणिक वर्ष-२०२४-२५ साठी विद्यालयात, नव्याने प्रवेश घेतलेल्या, इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे, शाळेच्या पहिल्या दिवशी गुलाबपुष्प, पेन व बिस्किट पुडा देऊन स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना, शासनाकडून आलेल्या, मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.**



विद्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुरेश जावळे होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे, थोर देणगीदार, श्यमनाजी तांबे साहेब, गोरेगावचे उपसरपंच श्री. आण्णा पाटील नरसाळे, श्री. गेनुभाऊ नरसाळे (विस्तार अधिकारी पं. समिती पारनेर), श्री बाबासाहेब चौरे सर, श्री मंजाबापू शेरकर, श्री. सहदेव अडसूळ, पत्रकार राम तांबे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने, प्रमुख पाहुण्यांचा शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या शुभहस्ते इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना, मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेमध्ये विद्यालयात, प्रथम तीन आलेले विद्यार्थी- दहावीत प्रथम चि. रोहन सहदेव अडसूळ, द्वितीय चि. साहिल संतोष नरसाळे, तृतीय चि. सार्थक मनेष तांबे, बारावी कला प्रथम क्रमांक कु. जयश्री रामदास चत्तर, चि. संदेश शिवाजी गोरे, कु. प्रतिभा बाळू पुंडे यांचा सत्कार केला.

या कार्यक्रम प्रसंगी विस्तार अधिकारी श्री. गेणूभाऊ नरसाळे, श्री. बाबासाहेब चौरे सर, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सुरेश जावळे यांनी आपल्या मनोगतातून सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्त्व सांगितले. श्री गेनूभाऊ नरसाळे (विस्तार अधिकारी) यांनी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय परीक्षेमध्ये जिल्हा गुणवत्ता यादीत येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.  उपसरपंच श्री. अण्णा पाटील नरसाळे, यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत २०० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना एक हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. तसेच श्री. बाबासाहेब चौरे सर, यांनी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये, गुणवत्ता यादीत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास ५०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्ष निवड गणित शिक्षिका सौ. ज्योती वाघ मॅडम यांनी केली. व अध्यक्षीय सूचनेस, सौ. सुजाता नरसाळे मॅडम यांनी अनुमोदन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, श्री. बाळासाहेब खिलारी सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन, कलाशिक्षक श्री. मंगेश काळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री. सुरेश वैरागर, श्री कैलास खिलारी, श्री. निलेश जासूद, श्री. किरण उमाप, श्री संजय मारवाडे, श्री. दत्तात्रय नरसाळे, श्री. आनंदा काकडे, श्री. सतीश चौधरी, सौ.अनुपमा नांगरे, श्रीम. कमल औटी, सौ. सुरेखा सुंबे, श्रीम. संध्या नरसाळे, श्रीम. मंजुषा शिंदे, श्रीम. धनश्री वाघ, श्रीम. प्रिया डव्हणे, सौ. अनिता तांबे, सौ. अनिता थोरात, विद्यार्थ्यांचे पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमईटी स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

**विविध मार्गदर्शकांनी समजावले योगाचे महत्त्व**



(छाया - शरद रसाळ, सुपा)

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा येथील माऊली एज्युकेशन ट्रस्टच्या एमईटी  इंग्लिश मिडीयम आणि ज्यूनियर कॉलेज व स्कायडल इंटरनॅशनल स्कूल मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २१ जून २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

जगभरात योगाचे महत्त्व आज पोहोचलेले आहे.सर्वाना उत्तम आरोग्य हवे तर योगा करण्याशिवाय  पर्याय नाही.हे भारतातील लोकांना माहीत होते. कारण का तर योगाचे मूळ किंवा योग हाच भारतातील ऋषि मुनि यांच्या साधनेतून आकारास आला आहे.

योग ही भारतीय भूमीतील अनमोल विद्या आहे आणि ही विद्या संपूर्ण विश्वाच्या कामी आली पाहिजे. योग हा जर मानवी जीवन सुखकारक करण्यासाठी, वेगवेगळ्या आजारांवर मात करण्यासाठी उपयोगी पडत असेल तर तो योग केवळ भारतापुरता  न राहता भारताबाहेर देखील जगभरामध्ये त्याचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे अशी भूमिका घेतली. म्हणूनच जगभरामध्ये जागतिक म्हणजेच २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो.

सदर कार्यक्रमात योगासनांचे व प्राणायाम चे महत्व संदीप गायकवाड सर यांनी सांगितले. तसेच योगा शिक्षक प्रमोद कणके सर  यांच्या मार्गदर्शनाखाली योगासनांचे विविध प्रकार विद्यार्थ्यांनी केले, यामध्ये सुर्य नमस्कार, ताडासन, वृक्षासन, अर्धचक्रासन, कपालभाती, अनुलोम विलोम, ध्यानधारणा इत्यादी इयत्ता नर्सरी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे सर, प्राचार्या सौ.मोनाली पठारे मॅडम, उपप्राचार्या अनिता शर्मा मॅडम तसेच सर्व शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# डी.बी.एम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

**मानसिक आरोग्यावर झाली महत्त्वाची चर्चा**

**सुपा : प्रतिनिधी**

**२१ जून रोजी डी.बी.एम स्कूल शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन विविध योगासनांचे सत्र घेतले. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या महत्त्वावर चर्चा करण्यात आली.**



(छाया - शरद रसाळ, सुपा)

विद्यालयातील शिक्षिका स्मिता मॅडम यांनी योग दिनाचे महत्व सांगताना माहिती दिली की, २१ जून २०१५ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावावरून संयुक्त राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची सुरुवात केली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली, त्यानंतर सर्वांनी एकत्रित सूर्यनमस्कार व मंत्र उच्चारण केले. ताडासन, वज्रासन, भुजंगासन, हलासन, सुखासन अश्या विविध योगासनांच्या प्रात्यक्षिकांसोबतच प्राणायाम आणि ध्यान सत्रही घेण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य श्री. जे. डी मापारी सर यांनी योग व सूर्यनमस्काराचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठीचे दैनंदिन जीवनातील फायदे सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, योगामुळे शारीरिक लवचिकता वाढते, स्नायू मजबूत होतात, तसेच मानसिक तणाव कमी होतो आणि मनःशांती मिळते. सूर्यनमस्कार केल्याने शरीराची ऊर्जा वाढते आणि शारीरिक तंदुरुस्ती सुधारते आदी माहिती दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दलची जागरूकता वाढवण्याचा शाळेचा उद्देश होता. पालकांनी देखील या उपक्रमाबद्दल कौतुक व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने डी बी एम स्कूल ने आरोग्यवर्धक जीवनशैलीचा संदेश दिला आणि विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्यासाठी प्रेरित केले.

# गुरूदेवमध्ये ९ हजार सूर्यनमस्कार

**जागतिक योग दिन साजरा**



**सुपा : प्रतिनिधी**

**"स्वयं और समाज के लिए योगा" या ब्रीद वाक्यानुसार २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गुरुदेव प्रशालेच्या बाजीराव नगर मधील क्रीडांगणावर भव्य स्वरूपात योग दिनाचे नियोजन करण्यात आले होते.**

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.मगर सर यांनी विदयार्थ्यांना योगाचे महत्व सांगताना सांगितले की, मन व शरीर सदृढ ठेवायचे असेल तर आपण रोज योगा केला पाहिजे. प्राचीन काळापासून भारत देशामध्ये  योगा चालू आहे. आपण रोज व्यायाम करण्याचा संकल्प करू व केलेला संकल्प वर्षभर पाळू असे आव्हान त्यांनी विदयार्थ्यांना केले. विदयार्थ्यांनी वर्षभर योगा करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

प्रशालेच्या प्रांगणामध्ये ८५० विद्यार्थी, ५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योग दिनाचे औचित्य साधून योगा, सूर्यनमस्कार, प्राणायाम इत्यादी प्रकार करून आरोग्य निरोगी राखण्याचा संकल्प केला. यावेळी स्पोर्ट्स टिचर बाबाजी दादा,ज्योतीताई देशमुख यांनी विदयार्थ्यांना योग प्रात्यक्षिक करून दाखवले .स्वराज गवारे या पाचवीच्या विदयार्थ्यांने योग दिनाबाबत भाषण केले.

या वेळी स्पोर्ट टिचर बाबाजी दादा व ज्योतीताई यांचा सत्कार संस्थेचे संस्थापक सुभाष मगर यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाचे नियोजन स्पोर्ट टीचर बाबाजी दादा व पर्यवेक्षक चितळकर सर यांनी केले व प्राचार्य श्री कदम सर यांनी सर्वांचे आभार मानले.

# निघोजला पत्रकार संघाचे विभागीय कार्यालय

**खा.नीलेश लंके यांचे हस्ते उद्घाटन**



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील पत्रकारांच्या विभागीय कार्यालयाचे उद्घाटन खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते शुक्रवार दि.२१ रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. मळगंगा मंदीराजवळील कन्हैया ज्वेलर्सचे संस्थापक अध्यक्ष मुकुंदराव निघोजकर यांच्या मालकीच्या बिल्डींगमधल्या गाळ्यात हे उद्घाटन करण्यात आले.**

यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाने व राज्य मराठी पत्रकार संघ पदाधिकारी व सदस्य यांनी निघोज येथील पत्रकार भवन साठी पंचवीस लाख रुपयांचा निधी देण्याची मागणी केली लोकसभा निवडणुकीत नीलेश लंके यांनी पत्रकारांना हा निधी निघोज येथील पत्रकार भवन साठी खासदार निधीतून देण्याचे आश्वासन दिले होते यासाठी लवकरच जागा उपलब्ध होणार असून जुलै महिन्यात जागेचा प्रस्ताव खासदार लंके यांना देणार असल्याची माहिती ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर व दत्ताजी उनवणे यांनी दिली आहे.

यावेळी शोभाताई निघोजकर व राणीताई निघोजकर यांनी खासदार नीलेश लंके यांचे औशंन केले तसेच लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल मिठाई भरवून अभिनंदन केले. यावेळी कन्हैया ज्वेलर्स व व्यापारी असोसिएशनच्या वतीने खासदार लंके यांचे सुदर्शन निघोजकर यांनी स्वागत केले.यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर, दत्ताजी उनवणे, सतिष रासकर, जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, अध्यक्ष बाबाजी वाघमारे, कार्याध्यक्ष शिरीष शेलार, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व राज्य मराठी पत्रकार संघाचे उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, कोषाध्यक्ष अविनाश भांबरे, सहसचिव जयदीप कारखीले, निघोज शहराध्यक्ष आनंद भुकन, प्रवक्ते जयसिंग हरेल, कार्यकारिणी सदस्य संदीप ईधाटे, योगेश खाडे आदी तसेच गाव व परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार लंके यांनी या विभागीय कार्यालयाबद्दल समाधान व्यक्त करीत लवकरच जागा उपलब्ध झाल्यानंतर तुमच्या पत्रकार भवन साठी निधी कशाप्रकारे उपलब्ध करता येईल यासाठी तरतूद करण्याचे आश्वासन दिले.

# वडगावपान मध्ये मालदाडच्या कृषिकन्यांचे स्वागत

**शेतकऱ्यांना केले मार्गदर्शन**




**पारनेर: प्रतिनिधी**

**मालदाड येथील श्रमशक्ती कृषी महाविद्यालयातील कृषी कन्यांचे वडगावपान येथे आगमन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन विविध गोष्टींबद्दल जागृकता, मार्गदर्शन चर्चे तून शेतकऱ्यांच्या समस्या निवारण त्या करत आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यापर्यंत माहित पुरविण्यास श्रमशक्ती कृषी महाविद्यालय नेहमीच सक्रिय सहभाग घेत असते. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना मार्गदर्शन करणे ही काळाची गरजच आहे. हे जाणून नेहमीच यशस्वीरित्या ते विविध उपक्रम राबवत असतात. कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्या या शेतकऱ्यांच्या खऱ्या कृषीदूत असल्याचे प्रतिपादन वडगावपानचे सरपंच श्रीनाथ थोरात यांनी केले.**

**ग्रामीण भागात शेती मोठ्या प्रमाणात केली जाते शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून मालदाड येथील श्रमशक्ती कृषी महाविद्यालय शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकरी वर्गाला मार्गदर्शन करत असते. आम्ही विद्यार्थ्यांनीही शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाविषयी सखोल मार्गदर्शन केले याचा शेतकरी वर्गाला निश्चित उपयोग होणार आहे. यापुढील काळातही शेतकऱ्यांना मोफत मार्गदर्शन करत राहणार आहे.**

**अस्मिता लबडे (कृषिकन्या)**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत सेवा संस्कार संस्थेचे मालदाड ता. संगमनेर येथील श्रमशक्ती कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एल. हारदे तसेच प्रोग्रॅम ऑफिसर प्रा. डी. डी. देसाई, यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी कन्या शिवांजली मेहेर, कोमल कानवडे, आश्वनी हजारे, अस्मिता लबडे, सोनाली गोसावी या कृषीकन्यांनी ग्रामिण कृषी जागरूकता व औद्योगिकता कार्यानुभव कार्यक्रम २०२४-२५ या अभ्यास दौऱ्या निमित्ताने वडगावपान ता. संगमनेर येथील शेतकऱ्यांना शेती विषयक शास्त्रीय माहिती देतात.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com